


दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : ३५५, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, बुधवार, दि.०५ ऑगस्ट २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# चंडीपुरा विषाणूचं गुजरातमध्ये थैमान, मेंदूला सूज येऊन २२ चिमुरड्यांचा करुण अंत


**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०४, अहमदाबाद :** गुजरातमध्ये चालू पावसाळ्यात चंडीपुरा विषाणूमुळे २२ मुलांचा मृत्यू झाला आहे. संशयास्पद संसर्गाच्या १८४ प्रकरणांपैकी ३५ रुग्णांचे अहवाल पॉझिटिव्ह आले आहेत, अशी माहिती राज्याचे आरोग्यमंत्री प्रफुल पानसेरिया यांनी सोमवारी दिली.

**३५ केस पॉझिटिव्ह !**

गांधीनगर, राजकोट आणि इतर जिल्ह्यांमधील शासकीय रुग्णालयांमध्ये सात रुग्णांवर उपचार सुरू आहेत. तसेच, अवयव निकामी होण्यासारखी गंभीर स्थिती टाळण्यासाठी, लक्षणे असलेल्या रुग्णांना त्वरित अतिदक्षता विभागात दाखल करण्याच्या सूचना सरकारी आणि खासगी बालरोग उपचार केंद्रांना देण्यात आले आहेत. राज्यात आतापर्यंत एकूण १८४ संशयास्पद प्रकरणे नोंदवली गेली आहेत; त्यापैकी ३५ प्रकरणे पॉझिटिव्ह आली आहेत आणि ११ नमुन्यांचे अहवाल अद्याप प्रलंबित आहेत, असे पानसेरिया यांनी सांगितले. १५ वर्षांखालील २२ मुलांचा मृत्यू

आतापर्यंत नोंदवलेल्या प्रकरणांपैकी २२ मुलांचा चंडीपुरा विषाणूमुळे मृत्यू झाला आहे. हे सर्व रुग्ण १५ वर्षांखालील वयोगटातील आहेत, असेही त्यांनी नमूद



केले. गांधीनगर, साबरकांठा-हिम्मतनगर, पाटण, राजकोट आणि भावनगर येथील शासकीय रुग्णालयांमध्ये दाखल असलेल्या मुलांना सर्वोत्तम आणि सुपर-स्पेशालिस्ट उपचार दिले जात आहेत आणि डॉक्टर त्यांच्या प्रकृतीवर लक्ष ठेवून आहेत, असे पानसेरिया यांनी सांगितले.

**वेगवेगळ्या भागातील मुलांचा समावेश...**

ही प्रकरणे वेगवेगळ्या भागांतून समोर येत आहेत आणि ती केवळ एका विशिष्ट गावापुरती मर्यादित नाहीत.मेंदूज्वर पसरवण्यास कारणीभूत असलेल्या ‘सँडफ्लाय’ नष्ट करण्यासाठी, जिथे पशुपालन केले जाते अशा भागांत आरोग्य पथकांकडून कीटकनाशकांची फवारणी केली जात आहे. या विषाणूची लक्षणे असलेल्या रुग्णांना ऑक्सिजन आणि व्हेंटिलेटर सुविधा असलेल्या अतिदक्षता विभागात दाखल करण्याच्या सूचना सरकारी आणि खासगी बालरोग उपचार केंद्रांना देण्यात आल्या आहेत. उपचारात विलंब होऊ नये जेणेकरून एकापेक्षा जास्त अवयव निकामी होणे यासारखी गंभीर स्थिती टाळता येईल, असे त्यांनी सांगितले.

**चंडीपुरा विषाणूजन्य आजार !**

चंडीपुरा एनसेफलायटीस हा एक विषाणूजन्य आजार आहे जो प्रामुख्याने सँडफ्लाय आणि इतर कीटकांमार्फत पसरतो आणि यामुळे मेंदूला सूज येते. १९६५ मध्ये महाराष्ट्रातील नागपूर जिल्ह्यातील चंडीपुरा गावातील एका रुग्णामध्ये हा विषाणू सर्वप्रथम आढळला होता.

# बेस्ट उपक्रमाचा ‘कायापालट प्रकल्प’ प्रस्तावास बेस्ट समितीची मंजुरी

**बेस्ट उपक्रमाची नाजूक आर्थिक परिस्थिती**

- संचित तूट - ७,३२२ कोटी
- एकूण दायित्व - १४,३२३ कोटी
- अतिरिक्त भार - १३.५६१ कोटी
- एकूण कर्ज - २५०० कोटी
- गॅज्युटी देणे - १५०० कोटी
- बेस्ट सक्षमतेची - १२८,००० कोटी निधीची आवश्यकता

**कायापालट प्रकल्पाने नेमके काय होणार ?**

- स्वकर्तृत्वावर निधीसाठी सार्वजनिक-खाजगी भागीदारी (पीपीपी मॉडल) नुसार पहिल्या टप्प्यात १० हजार बसेससाठी बस डेपो आणि ५ ते १० हजार कर्मचारी वसाहतींचे पूर्ण आधुनिकीकरण केले जाणार आहे. त्यानंतर उपक्रमाने निर्धारित केल्यानुसार सुसज्ज पार्किंग आणि सामाजिक पायाभूत सोयी-सुविधांची निर्मिती केली जाणार आहे. यात ३६ हजार कार पार्किंगची जागा अपेक्षित आहे. तसेच कला, केंद्र, संग्रहालय, क्रीडा, सांस्कृतिक सुविधा, व्यावसायिक संकुल, आरोग्य आणि शिक्षण इमारती याचा समावेश आहे.

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०४, मुंबई :** बेस्ट उपक्रमाला आर्थिक संकटातून बाहेर काढून स्वावलंबी बनवण्यासाठी मुंबईतील मोक्याच्या जमिनीचा सार्वजनिक-खाजगी भागीदारीत विकास करण्याचे महत्त्वाकांक्षी पाऊल बेस्ट प्रशासनाने उचलले आहे. यासाठी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री तसेच नगरविकास खात्याने दिलेल्या निर्देशानुसार बेस्ट उपक्रमाचा सर्वसमावेशक ‘कायापालट प्रस्ताव’ मंगळवारी बेस्ट समितीसमोर सादर करण्यात आला. त्यावर सभागृहात चर्चा होऊन बेस्ट समितीने या प्रस्तावास तत्वतः मंजुरी दिली आहे. त्यातून कोट्यवधीचा अपेक्षित महसूल उभा केला जाईल, असा विश्वास बेस्ट समितीने व्यक्त केला आहे. मात्र, पीपीपी तत्वाच्या नावाखाली बेस्टच्या २२ आगाराची ३२५ एकर जमीन खाजगी विकासकांच्या घशात घालण्याचा हा डाव असल्याची चर्चा विरोधक आणि बेस्ट वर्तुळात रंगली आहे.

कुलाबा बेस्ट भवन येथे मंगळवारी बेस्ट समितीच्या बैठकीत हा प्रस्ताव सादर करण्यात आला. त्यावर सभागृहात सादरीकरण आणि चर्चा करण्यात आली. विरोधी सदस्य नितीन नांदगावकर यांनी चर्चेदरम्यान

सार्वजनिक-खाजगी भागीदारीतुन बेस्ट आगारांचा पुनर्विकास करताना त्याची जुनी ओळख तशीच राहील काय ?, कामगारांची संख्या वाढल्यावर नियोजन कसे होणार?, कर्मचाऱ्यांसाठी किती घरे बांधणार?, कंत्राटी बेस्ट गाड्या कायम बंद होणार का? असे सवाल उपस्थित केले. याबाबत कोणताही आराखडा न देता केवळ रंगीत चित्रे दाखवी जात आहेत. यामागे काहीतरी कारस्थान असल्याची शंका त्यांनी व्यक्त केली. तसेच भाजपा सदस्य सुनील गणाचार्य यांनी ही करारातील त्रुटींवर बोट ठेवले. तर सत्ताधारी सदस्य प्रभाकर शिंदे यांनी बेस्टची आर्थिक स्थिती पाहता आर्थिक स्थैर्यासाठी हा प्रस्तावात तातडीने हात घालावा, असे मत व्यक्त केले. वाढत्या विरोधानंतर हा केवळ प्राथनिक प्रस्ताव आहे. यामध्ये अजून बदल होऊ शकतात. शासनाच्या मजुरीनंतरच तो अंतिम केला जाईल, अशी बचावात्मक भूमिका बेस्ट महाव्यवस्थापक सोनिया सेठी यांनी घेतली. त्यावर राज्य शासनाने या प्रस्तावास मान्यता दिली आहे. बेस्टला स्वबळावर उभे करण्यासाठी हे महत्वाचे असल्याचे सांगत बेस्ट समिती अध्यक्ष तृष्णा विश्वासराव यांनी हा प्रस्ताव बहुमताच्या जोरावर मंजूर केला.

बेस्ट समितीने ‘कायापालट प्रस्ताव’ तत्वतः मंजूर केल्यामुळे पुढील कार्यवाहीसाठी हा प्रस्ताव आता मुंबई महापालिकेकडे सादर केला जाणार आहे. आणि त्यानंतर राज्य मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी पाठवण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. दरम्यान, पीपीपीच्या नावाखाली बेस्टच्या मोक्याच्या २२ आगाराची ३२५ एकर जमीन खाजगी विकासकांच्या घशात घालण्याचा हा डाव असल्याची चर्चा बेस्ट वर्तुळात सुरू आहे.

# पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांचे निधन, पंतप्रधान मोदींसह राज्यभरातून शोकभावना



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०४, कोल्हापूर :** देशातील शिक्षण क्षेत्राला नवी दिशा देणारे, पद्मश्री पुरस्काराने सन्मानित शिक्षणमहर्षी डॉ. ज्ञानदेव यशवंतराव पाटील अर्थात डॉ. डी. वाय. पाटील यांचे सोमवारी ४ ऑगस्ट रोजी वयाच्या ९१ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. कोल्हापूरच्या कसबा बावडा येथील त्यांच्या ‘यशवंत’ निवासस्थानी सकाळी साधारण ११ वाजता त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने राज्यासह देशभरातील शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात हळहळ व्यक्त होत असून, शिक्षण क्षेत्रातील एका युगाचा अंत झाल्याची भावना राज्यासह देशभरातील मान्यवरांनी व्यक्त केली आहे.

डॉ. डी. वाय. पाटील यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपर्यंत उच्च शिक्षणाच्या संधी पोहोचविण्याचा ध्यास घेत अनेक शैक्षणिक संस्था उभारल्या. वैद्यकीय, अभियांत्रिकी, कृषी, व्यवस्थापन आणि इतर विविध शाखांमध्ये त्यांनी उभारलेली शैक्षणिक व्यवस्था आज देशभरातील लाखो विद्यार्थ्यांसाठी ज्ञानाचे केंद्र बनली आहे. शिक्षणाबरोबरच समाजकारण आणि सार्वजनिक जीवनातही त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. बिहार, त्रिपुरा आणि पश्चिम बंगाल या राज्यांचे राज्यपाल म्हणूनही त्यांनी जबाबदारी सांभाळली होती.

**तेज पाटील यांची भावनिक प्रतिक्रिया !**

वडिलांच्या निधनानंतर माजी गृहराज्यमंत्री आणि काँग्रेसचे विधानपरिषद गटनेते आमदार सतेज पाटील यांनी सोशल मीडियावर भावना व्यक्त करत, आमच्या कुटुंबाचा आधारवड हरपला आहे. त्यांनी आयुष्यभर शिक्षण, समाजसेवा आणि माणुसकीची मूल्ये जपली. हजारो नव्हे, तर लाखो विद्यार्थ्यांच्या आयुष्यात त्यांनी आशेचा दिवा पेटवला, अशा शब्दांत त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

**पंतप्रधान मोदींसह मान्यवरांकडून श्रद्धांजली**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही सोशल मीडियावरील पोस्टमधून डॉ. पाटील यांच्या कार्याला उजाळा दिला. शिक्षणाचा प्रसार आणि गरजू घटकांच्या उन्नतीसाठी त्यांनी केलेले कार्य कायम स्मरणात राहील, अशा शब्दांत त्यांनी शोकसंवेदना व्यक्त केल्या. याशिवाय राज्यातील विविध पक्षांच्या नेत्यांनीही त्यांना आदरांजली वाहिली.

भाजपचे खासदार धनंजय महाडिक यांनी त्यांना पितृतुल्य व्यक्तिमत्त्व संबोधत त्यांच्या निधनामुळे शिक्षण आणि सार्वजनिक जीवनाची मोठी हानी झाल्याचे म्हटले. आमदार अमल महाडिक यांनी ज्ञानाचा दीप प्रज्वलित करणारा एक ऋषितुल्य नेता आपल्यातून गेला, अशी भावना व्यक्त केली.

**आज शासकीय इतमामात अंत्यसंस्कार**

डॉ. डी. वाय. पाटील यांचे पार्थिव आज (५ ऑगस्ट) सकाळी ९ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत कसबा बावडा येथील ‘यशवंत’ निवासस्थानी नागरिकांच्या अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे. त्यानंतर सायंकाळी ५ वाजता पॅव्हिलियन मैदानावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

डी. वाय. पाटील यांच्या अंत्यसंस्कारासाठी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्यासह विविध पक्षांचे वरिष्ठ नेते, लोकप्रतिनिधी, शिक्षणतज्ज्ञ आणि समाजातील मान्यवर उपस्थित राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

डॉ. डी. वाय. पाटील यांच्या निधनाने केवळ एक शिक्षणतज्ज्ञ नव्हे, तर शिक्षणाच्या माध्यमातून समाजपरिवर्तन घडवून आणणारे दूरदृष्टीचे नेतृत्व हरपल्याची भावना राज्यभरातून व्यक्त होत आहे. त्यांच्या कार्याचा वारसा आणि त्यांनी निर्माण केलेल्या संस्था पुढील अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहतील, अशी भावना शोकसंदेशांमधून व्यक्त करण्यात येत आहे.

# ठाणे जिल्ह्यात कर्जमुक्तीच्या पहिल्या टप्प्याला वेग; आधार प्रमाणीकरण (ई-केवायसी) पूर्ण करण्याचे आवाहन

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०४, ठाणे :** राज्य शासनाच्या ‘पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६’ अंतर्गत ठाणे जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांना कमाल रुपये २.०० लाख मर्यादेपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ देण्याची प्रक्रिया वेगाने सुरू आहे.

या पार्श्वभूमीवर ठाणे जिल्ह्यातील पात्र शेतकरी बांधवांना या योजनेचा तात्काळ लाभ मिळावा, यासाठी आधार प्रमाणीकरणाची (अरवहरॲ श-घधउ) प्रक्रिया सध्या गतिमान करण्यात आली आहे. ३१ जुलै २०२६ अखेर प्राप्त झालेल्या यादीतील जिल्ह्यातील एकूण १० हजार ९६२ पात्र खातेदार शेतकऱ्यांपैकी ८ हजार ४४४ शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण यशस्वीरीत्या पूर्ण झाले आहे. तर उर्वरित २ हजार ५१८ शेतकऱ्यांनी आपले आधार प्रमाणीकरण त्वरित पूर्ण करून घ्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले आहे.

या महत्वाकांक्षी योजनेंतर्गत ठाणे जिल्ह्यातील ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत १६ हजार ८३६ आणि राष्ट्रीयकृत बँकांमार्फत १ हजार २३२ अशा एकूण १८ हजार ०६८ शेतकरी खातेदारांची माहिती शासनाच्या पोर्टलवर अपलोड करण्यात आली होती. त्यापैकी पहिल्या टप्प्यात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या १० हजार ५२५ आणि राष्ट्रीयकृत बँकांच्या ४३७ अशा एकूण १० हजार ९६२ पात्र खातेदार शेतकऱ्यांची पहिली यादी प्राप्त झाली आहे. जिल्ह्यातील सर्व व्यापारी, राष्ट्रीयकृत बँका आणि जिल्हा अग्रणी व्यवस्थापकांना (ङ्च्) तात्काळ उर्वरित सर्व खात्यांचे आधार प्रमाणीकरण पूर्ण करण्याचे निर्देशही डॉ. पांचाळ यांनी दिले आहेत.

आधार प्रमाणीकरणाचे काम सर्व ‘आपले सरकार’ व ’महा-ई-सेवा’ केंद्रांवर सुरू असून या कामासाठी शेतकऱ्यांकडून कोणतेही शुल्क आकारले जाऊ नये, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

कर्जमुक्ती योजनेची दुसरी यादी १५ ऑगस्टनंतर प्रसिद्ध केली जाणार आहे. शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण पूर्ण करताच थकीत कर्जाची रक्कम थेट त्यांच्या खात्यावर वर्ग केली जाईल, ज्यामुळे शेतकऱ्यांना चालू खरीप हंगामासाठी पुन्हा नवीन पीककर्ज मिळणे शक्य होणार आहे. पात्र सभासदांच्या याद्या संबंधित बँक शाखा, सेवा सहकारी संस्था, ग्रामपंचायत आणि तलाठी कार्यालयात उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.शेतकऱ्यांनी आपल्या जवळच्या ’आपले सरकार’ किंवा ’महा-ई-सेवा’ केंद्रावर जाऊन आधार प्रमाणीकरण त्वरित पूर्ण करून घ्यावे. यासाठी कोणतेही शुल्क द्यायचे नाही. ज्या शेतकऱ्यांनी अद्याप ’ॲग्रीस्टॅक’ (असअॅळडींरलङ्ग) नोंदणी केलेली नाही, त्यांनी ती तात्काळ करून घ्यावी. याबाबत काही अडचण असल्यास जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. तसेच प्रमाणीकरणात अडचण आल्यास संबंधित सेवा सहकारी सोसायटीचे गटसचिव किंवा बँक निरीक्षक यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहनही जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ व जिल्हा उपनिबंधक डॉ. मांडे यांनी केले आहे.

# दूरदृष्टीचे शिक्षणमहर्षी डॉ.डी.वाय. पाटील यांना परिवहन मंत्री सरनाईक यांची भावपूर्ण श्रद्धांजली

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०४, मुंबई :** ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ, समाजसेवक आणि माजी राज्यपाल डॉ. डी. वाय. पाटील यांच्या निधनाबद्दल परिवहन मंत्री तथा महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी तीव्र दुःख व्यक्त करून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

आपल्या शोकसंदेशात मंत्री सरनाईक म्हणाले की, डॉ. डी. वाय. पाटील यांनी शिक्षण, आरोग्य आणि क्रीडा क्षेत्रात केलेले कार्य अतुलनीय आहे.



त्यांच्या दूरदृष्टीमुळे लाखो विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी उपलब्ध झाली. समाजहिताची जाणीव ठेवून उभारलेला त्यांचा शैक्षणिक आणि सामाजिक वारसा भावी पिढ्यांसाठी कायम प्रेरणादायी राहील.

डॉ. डी. वाय. पाटील यांच्या निधनाने महाराष्ट्राने एक दूरदृष्टीचा शिक्षणमहर्षी, समाजाभिमुख विचारवंत आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व गमावले आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो आणि त्यांच्या कुटुंबीयांना हे दुःख सहन करण्याची शक्ती देवो, अशा शब्दांत मंत्री सरनाईक यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.




## धरणी कापे थरथर

धक्के आणि हादरे राज्याला नवे नाहीत. परंतु, आता विषय राजकीय नव्हे, तर खऱ्याखुऱ्या धक्क्यांचा, अर्थात भूकंपाचा आहे. गेल्या आठवड्यात पालघर, हिंगोली, नाशिकसह काही जिल्हे भूकंपाने हादरले. हे धक्के सौम्य असल्याने कदाचित – प्रभावित भागाचा अपवाद वगळता – शासनासह अन्य कोणी ते गांभीर्याने घेतले नसावेत. परंतु, याच काळात देशाच्या इतर भागांत आणि हजारो किमी अंतरावरील जपानमध्येही तीव्र धक्के जाणवले. हा केवळ योगायोग की भूगर्भातील हालचालींचा एकमेकांशी काही संबंध आहे, याचा शोध घ्यायला हवा. कळवण, सुरगाणा, त्र्यंबकेश्वर आणि दिंडोरी या तालुक्यांना पंधरा धक्के बसल्याने नाशिकही घबराटीच्या कंपनांनी थरथरले. चार-पाच दिवस कंपने जाणवली. शेतांना भेगा पडल्या, घरांना तडे गेले, तर भूस्खलनही झाले. तरी प्रशासनाच्या मते, त्यांची तीव्रता सौम्य ते मध्यम स्वरूपाची होती.

राज्याच्या इतिहासात १९९३ मधील किल्लारीच्या प्रलयंकारी भूकंपाचा अपवाद वगळता, अशा मोठ्या आपत्तीची नोंद नाही. परंतु, तीस-बत्तीस वर्षांनंतरही तेव्हाचे चित्र आठवले तरी मनात धस्स होते. या आपत्तीमुळे लातूर व धाराशिव हे जिल्हे संवेदनशील मानले जातात. कोयना, वारणा परिसरातही धरणांशी संबंधित धक्के जाणवत असतात. मुंबईसह कोकण, ठाणे, पुणे आणि नाशिक परिसरालाही कमी तीव्रतेचे धक्के अधेमधे बसत असतात, ते सह्याद्रीच्या विस्तीर्ण डोंगररांगा, भूजलाचा दाब आणि भूगर्भातील प्लेट्समुळे. भारतीय भूवैज्ञानिक विभागाचा अहवालच तसे सांगतो. परंतु, या खेपेला धक्क्यांचे केंद्र बदलल्याचे सांगितले जाते. कळवण तालुक्यातील दळवटऐवजी ते दिंडोरी-सुरगाण्याकडे सरकले. परंतु, शास्त्रीय अभ्यासाच्या अभावामुळे त्याचाही खुलासा झालेला नाही. पावसाळ्यात जमिनीखालील 'फॉल्टलाइन'च्या बेसाल्ट खडकांमध्ये पाणी मुरून, घर्षण होऊन कंपने जाणवतात. आता प्रश्न आहे करावयाच्या उपायांचा.

राज्याला हादरे बसूनही ते मंत्रालयापर्यंत पोचत नाहीत. वरवरच्या उपाययोजना वा प्रभावित भागांत जनजागृती करण्यापलीकडे फारसे काही घडत नाही. दुर्घटनेपूर्वी लोक सतर्क होऊ शकले तर जीवितहानी टाळता येऊ शकते. उपाय, स्थलांतर, प्रशिक्षण आदींचे ढोबळ आराखडे तरी तयार असायला हवेत. तयारीअभावी, दुर्दैवाने हानी झालीच तर हातावर हात ठेवून बसण्याशिवाय पर्याय नाही. आपत्ती व्यवस्थापन विभाग महापालिकेसह स्थानिक स्वराज्य संस्थांकडे बोट दाखवतात, तर या संस्था अशा वेळी सरकारकडे बोट दाखवून हात झटकतात. खड्डे दुरुस्तीतच त्यांची दमछाक होत आहे, तेव्हा नैसर्गिक आपत्तींचा विचार केव्हा आणि कसा करणार? बहुधा त्यांची काही कंत्राटे असती तर विचार होऊ शकला असता!

डिजिटल भूमापन केंद्रांच्या अभावामुळे भूकंपाचे केंद्र लवकर लक्षात येत नाही. राज्यात सर्वत्र अशा वेधशाळा उभारल्या जाणार, असे वर्षानुवर्षे सांगितले जाते. पुणे विभागात आठ, तर कोकण व मराठवाड्यात प्रत्येकी चार केंद्रे अस्तित्वात येणार होती. मात्र, हा प्रकल्पच गुंडाळला गेला. गंभीर व संवेदनशील विषय निकाली काढण्याची परंपरा येथेही कायम राहिली. आता म्हणे, धरण क्षेत्रांत ही यंत्रे बसवली जाणार आहेत. भूकंपाच्या धक्क्यांचा धरणावर काय परिणाम झाला हे त्यामुळे समजू शकेल. धरणसुरक्षा महत्त्वाचीच. परंतु, जनसुरक्षेचे काय? प्रभावित परिसरातून आरडाओरडा झाल्यानंतर 'नॅशनल सिस्मॉलॉजिकल नेटवर्क'तर्फे (एनसीएन) चार भूकंपमापक यंत्रे बसवली जाण्याची घोषणा झाली. लोकांच्या जीविताच्या प्रश्नांवर कधीतरी घोडे वरातीपूर्वी दामटायला काय हरकत? बाकी येत्या काळातही भूकंपाची वृत्ते येत राहतील. परंतु, अशा आपत्तींचा मुकाबला करण्यासाठी आपण सज्ज आहोत काय, याचे 'होय' असे खात्रीशीर उत्तर कोणीच देऊ शकणार नाही. आणि कितीही हादरे बसले तरी ते उत्तर मागण्याचा प्रयत्न जनता करणार नाही. पुन्हा एकदा जिवावर बेतत नाही, तोवर हादऱ्यांबाबत हालचाल होणार नाही, हेच वास्तव

**- संपत थेटे**

# जंक फूडवर बंदी : विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी महत्त्वाचे पाऊल

महाराष्ट्र शासनाच्या अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) राज्यातील सर्व शाळांच्या ५० मीटर परिसरात जंक फूड विक्रीवर बंदी घालण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. शाळांच्या आजूबाजूला फास्ट फूड, शीतपेये, चिप्स, चॉकलेट, पॅकेज्ड स्नॅक्स आणि इतर आरोग्यास अपायकारक पदार्थांची सहज उपलब्धता विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी मोठा धोका ठरत होती. त्यामुळे हा निर्णय विद्यार्थ्यांच्या आरोग्याचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने अत्यंत स्वागतार्ह आहे.

आजच्या बदलत्या जीवनशैलीत म ुलांचा कल घरगुती पौष्टिक आहारापेक्षा पिझ्झा, बर्गर, फ्रेंच फ्राईज, नूडल्स, चिप्स, सॉफ्ट ड्रिंक्स यांसारख्या पदार्थांकडे अधिक वाढला आहे. या पदार्थांमध्ये साखर, मीठ, तेल आणि कृत्रिम रंगांचे प्रमाण जास्त असल्याने लठ्ठपणा, मधुमेह, रक्तदाब, दातांचे विकार, पचनाचे आजार आणि इतर अनेक आरोग्य समस्या बालवयातच निर्माण होत आहेत. जागतिक आरोग्य संघटनेने (थक्ज) देखील बालकांमध्ये वाढणाऱ्या लठ्ठपणाबाबत वारंवार चिंता व्यक्त केली आहे.

शाळा हे केवळ शिक्षणाचे केंद्र नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे केंद्र आहे. त्यामुळे शाळेच्या परिसरात आरोग्यदायी वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना पौष्टिक आहाराची सवय लागावी, यासाठी शाळांमधील कँटीनमध्ये सकस आणि संतुलित अन्न उपलब्ध करून देणे तितकेच म





हत्त्वाचे आहे. फक्त जंक फूडवर बंदी घालून हा प्रश्न पूर्णपणे सुटणार नाही. त्यासाठी फळे, दूध, ताक, मोड आलेली कडधान्ये, ताजे फळांचे रस, पौष्टिक नाश्ता यांना प्रोत्साहन द्यावे लागेल.

या आदेशानुसार शाळांची नियमित तपासणी केली जाणार असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल. हा निर्णय प्रभावी ठरण्यासाठी स्थानिक प्रशासन, शाळा व्यवस्थापन, पालक आणि विक्रेते यांचे सहकार्य अत्यंत आवश्यक आहे. अनेकदा शाळेच्या गेटबाहेर हातगाड्यांवर किंवा छोट्या दुकानांमध्ये विद्यार्थ्यांना आकर्षित करणारे पदार्थ विकले जातात. अशा विक्रेत्यांवरही प्रभावी नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे.

पालकांची भूमिकाही येथे अत्यंत म हत्त्वाची आहे. अनेक पालक मुलांच्या हट्टापायी रोज खाऊसाठी पैसे देतात. त्याऐवजी घरातून पौष्टिक डबा देणे, संतुलित आहाराचे महत्त्व समजावून सांगणे आणि स्वतःही आरोग्यदायी जीवनशैलीचे उदाहरण ठेवणे आवश्यक आहे. मुलांमध्ये लहानपणापासून योग्य आहाराच्या सवयी रुजल्यास त्याचा सकारात्मक परिणाम आयुष्यभर दिसून येतो.

शाळांमध्ये पोषण शिक्षणावर भर देणे, संतुलित आहाराचे महत्त्व अभ्यासक्रम ातून सांगणे, नियमित आरोग्य तपासणी करणे आणि विद्यार्थ्यांमध्ये व्यायाम व मैदानी खेळांची आवड निर्माण करणेही तितकेच आवश्यक आहे. मोबाईल, टीव्ही आणि संगणकासमोर वाढणारा वेळ कमी करून शारीरिक हालचालींना प्रोत्साहन दिल्यास विद्यार्थ्यांचे आरोग्य अधिक सक्षम होईल.

मात्र, या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी हेच खरे आव्हान आहे. अनेक वेळा नियम तयार होतात; परंतु त्यांची काटेकोर अंमलबजावणी होत नाही. त्यामुळे संबंधित विभागाने नियमित तपासणी, जनजागृती आणि दंडात्मक कारवाई यांचा समतोल राखणे आवश्यक आहे. केवळ बंदी नव्हे, तर आरोग्यदायी पर्याय सहज उपलब्ध करून देणेही तितकेच महत्त्वाचे आहे.


विद्यार्थी हे देशाचे भवितव्य आहेत. त्यांचे आरोग्य सुदृढ राहणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. जंक फूडवरील निर्बंध हा केवळ एक प्रशासकीय निर्णय नसून निरोगी पिढी घडविण्याच्या दिशेने टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल आहे. शासनाचा हा निर्णय प्रभावीपणे राबविला गेला आणि पालक, शिक्षक व समाजाने त्याला सकारात्मक साथ दिली, तर भविष्यात अधिक निरोगी, सक्षम आणि जागरूक पिढी घडण्यास निश्चितच मदत होईल.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा, पुणे**

# प्रथमोपचार द्या; मात्र योग्य पद्धतीने !

समाजातील भावनाशीलता, माणुसकी हरवत चालल्याची उदाहरणे एकामागोमाग एक समाजात घडत असताना भोपाळमध्ये मात्र संकटसमयी एका महिलेला केलेली मदत तिच्या आयुष्याचं दुखणं बनली आहे.

मध्य प्रदेशमधील मुरैना जिल्ह्यातील तिलोंजरी उच्च माध्यमिक शाळेत शिकवणाऱ्या ४१ वर्षीय शिक्षिका ललिता धाकड स्कूटरने शाळेत जात होत्या. भुरावली चौकात आल्या असता त्यांना अचानक भोवळ येऊन त्या खाली पडल्या. त्याबरोबर आसपासची अनेक मंडळी त्यांच्या भोवती गोळा झाली. धाकड यांना हृदय विकाराचा झटका आला असावा असा लोकांचा समज होऊन तेथे उपस्थित असलेल्या एका तरुणाने तत्परतेने त्यांना सीपीआर देण्यास सुरुवात केली. त्यांना रुग्णालयात नेईपर्यंत सदर तरुण त्यांना अखंडपणे सीपीआर देत होता. रुग्णालयात



पोहोचताच क्षणी डॉक्टरांनी धाकड यांच्यावर तातडीने उपचार सुरु केले तेव्हा वेगळीच बाब समोर आली. ललिता धाकड यांना हृदय विकाराचा झटका आलाच नव्हता. त्यांना केवळ भोवळ आली होती. बराच वेळ त्यांना चुकीच्या पद्धतीने सीपीआर दिला गेल्याने त्यांच्या दोन बरगड्या मोडल्याचे डॉक्टरांनी सांगितले. प्रथमोपचार देण्याच्या उद्देशाने धाकड यांना केलेले साहाय्य त्यांना चांगलेच महागात पडले आहे.

एखाद्या व्यक्तीला हृदय विकाराचा झटका आला, विजेचा झटका बसला, गंभीर दुखापत झाली किंवा बुडालेल्या व्यक्तीला बाहेर काढल्यावर सीपीआर दिला जातो. अशा व्यक्तीचे हृदय बंद पडल्यासारखे वाटते, श्वासाची गती मंदावते, नाडीचे ठोक जाणवायचे बंद होतात अशावेळी योग्य प्रकारे सीपीआर द्यायचा असतो.

सीपीआर देण्यापूर्वी या प्राथमिक तपासण्या सीपीआर देणाऱ्या व्यक्तीने तातडीने करायला हव्यात. बेशुद्ध पडलेल्या व्यक्तीला चुकीच्या पद्धतीने सीपीआर दिल्यास त्या व्यक्तीचा जीव जाण्याचीही शक्यता असते. शहरासारख्या ठिकाणी रुग्णालये सहज उपलब्ध असतात. ग्रामीण भागात मात्र तसे नसते. त्यामुळे रुग्णाला रुग्णालयात नेण्यापूर्वी प्रथमोपचार दिल्यास डॉक्टरांना पुढील उपचार करणे सुलभ होते. दैनंदिन जीवनातही प्रथम ोपचाराचे महत्व अनन्यसाधारण आहे.

त्यामुळे काही खासगी कंपन्यांत, कार्यालयांत कर्मचाऱ्यांना प्रथमोचार प्रशिक्षण दिले जाते. शालेय अभ्यासक्रमातही प्रथम ोपचाराची तोंडओळख करून दिली जाते; मात्र खरी कसोटी जेव्हा प्रथमोपचार देण्याची वेळ येते तेव्हाच होते.

चुकीच्या पद्धतीने दिलेले प्रथमोपचार डॉक्टरांसाठी आणि रुग्णांसाठी डोकेदुखी ठरू शकतात हे वरील उदाहरणावरून स्पष्ट होते. केवळ इतरांनाच नव्हे तर घरातील एखाद्या व्यक्तीला प्रथमोपचार देण्याची गरज केव्हाही भासू शकते अशावेळी आपली छोटीशी कृती आपल्या जवळच्या व्यक्तीचा जीव वाचवू शकते त्यामुळे प्रथमोचार प्रशिक्षण हे आजमि तीला सर्वांसाठी आवश्यक आहे. मात्र ते घेताना त्यातील बारकावेही लक्षात घ्यायला हवेत.

**– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क करा. ९६६४५५९७८०**

## पृथ:करण

वैतागून बोलले नेता
नकोवाटे राजकारण
गलिच्छ झाले सगळे
हे चिखलाचेशिकरण

भोगत असता सत्ता
चांगले वाटले धोरण
राजेशाहीची तीवस्त्रे
सुखानंदे करी धारण

पक्षाने किती दिले रे
क्षणार्धांत वि स्मरण
आपलेयोगदान कसे
कधीतरी करे स्मरण

आकाश कोसळे तसे
घाले लोटांगण शरण
पडद्या आड आठवण
कितीदा चुकले मरण

प्रमाद घाले उदरांमधे
कसे पकडे घट्ट चरण
गळ्यात माळ शोभते
जयकारां येते स्फुरण

अनुभव मिळेमौलिक
गुरुंचे केले अनु चरण
पद चिन्हे आधार देई
कैकदाभले अनुसरण

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

## ४० वर्षांचा वनवास; लेंडी धरण प्रकल्पग्रस्तांची प्रशासकीय आणि राजकीय व्यवस्थेकडून क्रूर थट्टा थांबेल काय



**अक्षराज : अशोक लोणीकर**

**दि.०४, मुखेड (नांदेड) :** मुखेड तालुक्यातील रावणगाव - गोणेगाव येथे होऊ घातलेल्या अंतरराज्य लेंडी धरणामध्ये बाधीत झालेली ११ गावे सुजलाम् सुफलाम् होतील, हजारो हेक्टर सोन्यासारख्या जमिनीला पाणी मिळेल आणि परिसराचा विकास होईल, या उदात्त भावनेतून महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांनी धरणाचे उद्घाटन तब्बल ४० वर्षापुर्वी केले होते. ११ गावांतील प्रकल्पग्रस्तांनी आपल्या सोन्यासारख्या जमिनी आणि राजवाड्यासारख्या घरांवर तुळशीपत्र ठेवले. मात्र, चार दशके उलटूनही या प्रकल्पग्रस्तांच्या नशिबी केवळ , उपेक्षा आणि प्रशासकीय अवहेलनाच आली आहे. राजकीय इच्छाशक्तीचा अभाव आणि प्रशासनाच्या नाकर्तेपणामुळे आज मुक्रमाबाद आणि परिसरातील प्रकल्पग्रस्त उघड्यावर आले असून, त्यांची ही ससेहोलपट थांबायला तयार नाही.

लेंडी धरण प्रकल्पासाठी जमिनी देणाऱ्या या प्रकल्पग्रस्तांची पुनर्वसनाच्या नावाखाली केवळ थट्टाच करण्यात आली आहे. राजकीय डावपेचांमुळे योग्य पुनर्वसन तर झालेच नाही, उलट तुटपुंजा मावेजा देऊन सर्वसामान्यांची बोळवण करण्यात आली. विशेष म्हणजे, जाहीर झालेली तुटपुंजी रक्कमही वेळेवर मिळालेली नाही. शेताचा थकीत मावेजा, स्वेच्छा भत्ता आणि वाढीव कुटुंबांना द्यावयाची मदत अजूनही कागदावरच पाय रोवुन उभी आहे. गेल्या ४० वर्षांपासून परिसरातील नागरिक ना नवीन घर बांधू शकत आहेत, ना आपली मूळ जागा सोडून जाऊ शकत आहेत.

ऐतिहासिक वारसा लाभलेल्या मुक्रमाबाद शहराचे या धरणामुळे पूर्णपणे विद्रूपीकरण झाले आहे. येथील श्रीमंत आणि राजकीय ताकद असलेले लोक निघून गेले, मात्र दीनदलित आणि अत्यंत गरीब कुटुंबे आजही नदीकाठच्या पडक्या-झोपड्यांमध्ये अत्यंत बिकट परिस्थितीत दिवस काढत आहेत. गेल्या वर्षी लेंडी व तेरु नदीला आलेल्या महाभयंकर महापुराने या भागात प्रचंड असे थैमान घातले होते. यात अनेक नागरिकांना आपला जीव गमवावा लागला, तर कित्येक मूक्या जनावरांचा दावणीला बांधलेल्या ठीकाणी बळी गेला. एवढी मोठी जीवित आणि वित्तहानी होऊनही संबंधित प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याचे मोठे कार्य केले नाही. परिसराचा विकास, भौतिक सोयी-सुविधा आणि पुनर्वसनाच्या गप्पा फक्त निवडणुकांपुरत्याच मर्यादित असतात का ? असा संतप्त प्रश्न आता प्रकल्पग्रस्त करत आहेत. आपल्या हक्काच्या जमि नी देऊनही आज स्वतःच्याच मायभूमीत पोरका झाल्यासारखे जगणाऱ्या या प्रकल्पग्रस्तांच्या वेदनांचा अंत होईल व त्यांचे अच्छे दिन येतील का...? व धरणग्रस्तांना कधी न्याय मिळणार, हाच मोठा प्रश्न कायम राहतो की काय ? असे मन सुन्न करणारे प्रश्न प्रकल्पग्रस्तांच्या मनात पडलेले असतात.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात बातम्या

### अचूक सापळा अन् अंमली पदार्थ विक्रेत्याला बेड्या



**अक्षराज : प्रणिल कुसाळे**

**दि.०४, येरवडा (पुणे) :** लक्ष्मीनगर पोलिसांनी डेक्कन कॉलेज परिसरात अंमली पदार्थांविरोधात कारवाई करत एका तरुणाला ४०४ ग्रॅम गांजासह अटक केली. ही कारवाई ३ ऑगस्ट रोजी रात्री सुमारे १०.१५ वाजता करण्यात आली. पो. शि.राहुल परदेशी व पो. शि.किरण भागीत यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे, पोलिसांनी सागर गणेश कसबे (वय २८, रा. सर्व्हे क्र. १२, भीमज्योत मित्र मंडळाजवळ, लक्ष्मीनगर, येरवडा) याची तपासणी केली. त्याच्याकडून काळ्या रंगाच्या प्लास्टिकच्या पिशवीत ठेवलेला ४०४ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला. जप्त केलेल्या गांजाची अंदाजे किंमत ८ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली आहे. आरोपीकडे गांजा कुठून आला, तो विक्रीसाठी आणला होता का आणि त्यामागे आणखी कोणाचे जाळे कार्यरत आहे का, याचा तपास सुरू आहे. सदर कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक रविंद्र कदम, पोलीस निरीक्षक (गुन्हे) निळकंठ जगताप व सहायक पोलीस निरीक्षक दत्तात्रय लिगाडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक तुकाराम सुरवसे करीत आहेत.

### शेतात काम करताना सर्पदंश; युवा शेतकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०४, जिवती (चंद्रपूर) :** जिवतीतालुक्यातील संगणापूर येथील २२ वर्षीय युवा शेतकरी शुभम बाबाराव पोले यांचा शेतात काम करत असताना सर्पदंश झाल्याने दुर्दैवी मृत्यू झाला. रविवारी सकाळी घडलेल्या या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. दिनांक ०२ ऑगस्ट २०२६ रोजीसकाळी सुमारे ६ वाजताच्या सुमारास शुभम नेहमीप्रमाणे आपल्या शेतात शेतीची कामे करत होता. त्याचवेळी विषारी सापाने त्यांना दंश केला. ही बाब लक्षात येताच कुटुंबीयांनी आणि ग्रामस्थांनी त्यांना तातडीने गडचांदूर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचार केल्यानंतर प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी चंद्रपूर येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात रेफर करण्यात आले. मात्र, उपचार सुरू असतानाच त्यांची प्राणज्योत मालवली. शुभम पोले हे मेहनती, कष्टाळू आणि होतकरू युवा शेतकरी म्हणून परिसरात परिचित होते. त्यांच्या अकाली निधनाने संगणापूर गावासह परिसरात शोककळा पसरली आहे.

### नगरपंचायत पालम येथे ASDD मतदार यादीचे वाचन व प्रकाशन

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०४, पालम (परभणी) :** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी तथा सहाय्यक निवडणूक नोंदणी अधिकारी, गंगाखेड यांच्या मार्गदर्शनाखाली आज नगर पंचायत, पालम येथे प्रत्येक वॉर्डातील अट्टू (Absent, Shifted, Dead, Duplicate) मतदार यादीचे वाचन व प्रकाशन करण्यात आले. यावेळी नगर पंचायत पालमच्या कार्यक्षेत्रातील वॉर्ड सदस्य, बूथ लेव्हल अधिकारी (BLO), नागरिक व संबंधित अधिकारी उपस्थित होते. प्रकाशित करण्यात आलेली अट्टू मतदार यादी नागरिकांच्या माहितीसाठी उपलब्ध करून देण्यात आली असून, यामधील नावांबाबत कोणतीही हरकत, दुरुस्ती अथवा आवश्यक माहिती असल्यास संबंधित BLO अथवा नगर पंचायत, पालम येथे त्वरित संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

मुख्याधिकारी तथा सहाय्यक निवडणूक नोंदणी अधिकारी, नगर पंचायत पालम यांनी सर्व नागरिकांना आवाहन केले की, मतदार यादी शुद्ध, अद्ययावत व अचूक ठेवण्यासाठी प्रत्येक मतदाराने आपले नाव तपासून आवश्यक असल्यास संबंधित कागदपत्रांसह माहिती द्यावी. यामुळे मतदार यादी अधिक पारदर्शक व अचूक होण्यास मदत होईल. नगरपंचायत पालम प्रशासनाने सर्व नागरिकांना अट्टू मतदार यादीचे अवलोकन करून आवश्यक त्या सूचना विहित मुदतीत सादर करण्याचे आवाहन केले आहे.

### कोकणवासीयांसाठी नवी ट्रेन; केंद्रीय रेल्वेमंत्री यांचा शिवसेनेतर्फे सत्कार



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०४, मुंबई :** छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) ते सावंतवाडी रोड दरम्यान नियमित एक्सप्रेस ट्रेन सुरु करण्यास भारतीय रेल्वेने मंजुरी दिल्याबद्दल आज नवी दिल्लीत केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांचा शिवसेना पक्षाच्या वतीने तसेच कोकण वासियांच्या वतीने जाहीर सत्कार करण्यात आला. संसदीय गटनेते डॉ.श्रीकांत एकनाथ शिंदे, खासदार नरेश म्हस्के, महाराष्ट्र विधान परिषदेचे उपसभापती सचिन अहिर, खासदार संजय दिना पाटील, खासदार श्रीरंग बारणे, खासदार ओम राजे निंबाळकर यावेळी उपस्थित होते. खासदार डॉ.श्रीकांत शिंदे आणि खासदार नरेश म्हस्के यांनी ही ट्रेन सुरू करण्यासाठी पाठपुरावा केला होता. कोकण रेल्वे मार्गावर ही ट्रेन नियमित धावणार असून २२ स्थानकांवर ट्रेनला थांबा मिळाला आहे. या नवीन ट्रेन मुळे गणपतीमध्ये गावी जाणाऱ्या चाकरमान्यांची मोठी सोय होणार असून नियमित प्रवास करणाऱ्या कोकणवासीयांना खूप मोठा दिलासा मिळाला आहे.

### पोटा येथे एस.टी. महामंडळाच्या NCMC कार्ड शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०४, नागपूर :** पोटा येथे सहकार मित्र परिवार यांच्या वतीने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या छउचउ (छरींळेपरश्र उेोप चेलळश्रळीूं उरॲव) नोंदणी व कार्ड वितरण शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या शिबिरामध्ये सुमारे १०० लाभार्थ्यांची यशस्वी नोंदणी करून त्यांना छउचउ कार्डांचे वितरण करण्यात आले.

या शिबिरामुळे पात्र नागरिकांना एस.टी. महामंडळाच्या विविध प्रवासी सुविधांचा लाभ घेणे अधिक सुलभ होणार आहे. ग्रामस्थांनी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी अरविंद भड, अरुण काकडे, केवल मारबते, दामोदर क्षीरसागर, आकाश राऊत, आशिष मेंढे, पोलीस पाटील सुशील बोरकर, सलमान शेख तसेच इतर ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले. शिबिराच्या यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थित लाभार्थी व ग्रामस्थांनी आयोजकांचे कौतुक करून आभार व्यक्त केले.

# एलसीबी पोलिसांच्या पाठलागानंतर गोवंश तस्करीचा ट्रक जेरबंद

## दोघांना अटक, दोघे पसार; २२.३५ लाखांचा मुद्देमाल जप्त



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०४, चंद्रपूर :** स्थानिक गुन्हे शाखा (एलसीबी), चंद्रपूर यांनी गोपनीय माहितीच्या आधारे केलेल्या धडक कारवाईत भद्रावती परिसरात ३५ गोवंशांची अवैध वाहतूक उधळून लावत तब्बल ₹ २२.३५ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी चालक व क्लिनर, अशा दोघांना ताब्यात घेण्यात आले असून आणखी दोन आरोपींचा पोलीस शोध घेत आहेत. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि.०४ ऑगस्ट २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पोलीस स्टेशन पडोली हद्दीत नाकाबंदी करण्यात आली होती. दरम्यान, एमएच/३१/सीव्ही/०८१७ क्रमांकाचा १० चक्का टाटा ट्रक अडविण्याचा प्रयत्न केला असता चालकाने ट्रक न थांबवता भद्रावतीच्या दिशेने वेगाने पळ काढला. त्यानंतर एलसीबी च्या पथकाने तत्काळ पाठलाग करून सब स्टेशन पावर ग्रिड, जुना सुमठाणा, भद्रावती येथे ट्रक ताब्यात घेतला.

दरम्यान ट्रकची तपासणी केली असता, त्यामध्ये ३१ गायी व ४ बैल अशा एकूण ३५ गोवंशांची अवैधरित्या वाहतूक होत असल्याचे निष्पन्न झाले. कारवाई दरम्यान चालक व क्लिनर यांना ताब्यात घेण्यात आले. तसेच १० चक्का टाटा ट्रक, ३५ गोवंश आणि दोन मोबाईल हँडसेट, असा एकूण ₹ २२.३५ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**'ताब्यात घेण्यात आलेले आरोपी' :-** १) भुषण ओमकार तरारे (वय २४), रा.आझादनगर, कामठी, नागपूर.

२) सैय्यद जसिन सैय्यद असलम (वय ३३), रा.ताजबाग चौक, नागपूर.

**'पाहिजे आरोपी' :-** राकेशकुमार यावकराम टेकाम व मोसिन.

**'जप्त मुद्देमाल' :-** १० चक्का टाटा ट्रक (एमएच/३१/सीव्ही/०८१७), ₹१५ लाख, ३५ गोवंश (३१ गायी व ४ बैल) ₹ ७ लाख, २ मोबाईल हँडसेट ₹३५ हजार, याप्रकरणी भद्रावती पोलीस ठाण्यात प्राण्यांना क्रूरपणे वागविण्यास प्रतिबंध अधिनियम, १९६०, महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम, १९७६ तसेच बीएनएस, २०२३ मधील संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

सदरची कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक आयुष नोपानी, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांच्या नेतृत्वात एलसीबीउपविभागाच्या पथकाने यशस्वीरित्या पार पाडली.

## समाजकारण-राजकारणाचा कार्यतपस्वी आधारवड हरपला - मुख्यमंत्री



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०४, मुंबई :** शिक्षण, सहकार क्षेत्रातील कार्याने समाजकारण, राजकारणात भरीव योगदान देणारे आणि या क्षेत्रातील अनेक संस्थांचे आधारवड ठरलेले कार्यतपस्वी नेतृत्व पद्मश्री डॉ. डी.वाय. पाटील यांच्या निधनाने काळाने हिरावून नेले आहे, अशी शोकभावना व्यक्त करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बिहार, पश्चिम बंगाल, त्रिपुराचे माजी राज्यपाल पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. डॉ. पाटील यांच्या निधनामुळे सामाजिक आणि राजकीय क्षेत्राची मोठी हानी झाली आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

शोकसंदेशात मुख्यमंत्री म्हणतात, डॉ. पाटील यांनी ज्ञानदेव या आपल्या नावाप्रमाणेच ज्ञानाची आराधना केली. शिक्षण क्षेत्रालाच आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले. एका छोट्याशा शाळेपासून सुरू झालेला त्यांचा हा प्रवास थक्क करणारा आहे. सुमारे दोनशे संस्था, विविध प्रकारची आठ विद्यापीठे आणि हजारो विद्यार्थी, असा त्यांच्या कार्याचा विस्तार झाला. विशेषत: वैद्यकीय, अभियांत्रिकी, औषधनिमर्ण, आर्किटेक्चर अशा वैविध्यपूर्ण अभ्यासक्रमांची महाविद्यालये आणि आधुनिक सुविधांच्या उभारणीतून त्यांनी आपल्या शैक्षणिक समुहासोबतच महाराष्ट्राचा नावलौकिक उंचावला. या महाविद्यालयांच्या माध्यमातून वैद्यकीय सोयी सुविधा आणि आरोग्य सेवेचे जाळे विस्तारले. राजकारणातही त्यांनी काम केले. ते दोनदा विधानसभा सदस्य होते. पण डॉ. पाटील रमले शिक्षण, सहकार आणि सामाजिक क्षेत्रात. यातून त्यांनी अनेक भव्य दिव्य अशी शैक्षणिक संकुले, डॉ डी.वाय. पाटील आंतरराष्ट्रीय स्टेडियमसारखे प्रकल्पही साकारले. डॉ. पाटील हे सहकार, शिक्षण, सांस्कृतिक – साहित्यिक आणि सामाजिक चळवळीचे आधारवड होते. त्यांनी आयुष्यभर शिक्षण, सेवा आणि विनम्रतेची मूल्ये जपली. 'अहंकार म्हणजे जीवनाचा मृत्यू; तर अहंकाराचा मृत्यू म्हणजेच खरे जीवन' हा त्यांचा विचार त्यांच्या संपूर्ण जीवनकार्याचे प्रतिबिंब होता. त्यांनी रुजवलेली शिक्षणसेवेची परंपरा, विनम्रतेचा आदर्श आणि समाजहिताची मूल्ये कायम प्रेरणादायी राहतील. त्यांच्या जाण्याने एका दूरदर्शी शिक्षणमहर्षीचा अंत झाला असला, तरी त्यांचे विचार आणि कार्य पुढील अनेक पिढ्यांना मार्गदर्शन करत राहतील. डॉ. डी.वाय. पाटील यांच्या निधनामुळे त्यांच्याशी निगडित अनेक समूह, संस्थांवर शोकमग्न झाल्या आहेत. डॉ. पाटील यांच्या परिवारावर दुःखाचा आघात झाला आहे, या सर्वांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. या सर्वांना हे दुःख सहन करण्याची ताकद मिळावी, अशी ईश्वर चरणी प्रार्थना करतो, असे नमूद करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिक्षणमहर्षी डॉ डी. वाय. पाटील यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

## मुल - चंद्रपूर राष्ट्रीय महामार्गाच्या तातडीच्या दुरुस्तीसाठी आ.मुनगंटीवार यांचे केंद्रीय मंत्री गडकरींना पत्र



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०४, चंद्रपूर :** मुल–चंद्रपूर राष्ट्रीय महामार्गावरील वाढत्या खड्ड्यांमुळे प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून, अपघातांचे प्रमाणही वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर राज्याचे माजी वने व सांस्कृतिक कार्य मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री ना. नितीन गडकरी यांना सविस्तर पत्र पाठवून या महामार्गाची तातडीने उच्च दर्जाची दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे. तसेच भविष्यात वारंवार होणारी हानी टाळण्यासाठी या महामार्गाचे टप्प्याटप्प्याने सिमेंट काँक्रीटीकरण करण्यासाठी प्रशासकीय मंजुरी देण्याची विनंतीही त्यांनी केली आहे. प्रवाशांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत या महामार्गावर कायमस्वरूपी आणि दर्जेदार उपाययोजना राबविण्याची आवश्यकता आ. मुनगंटीवार यांनी पत्राद्वारे अधोरेखित केली आहे.

चंद्रपूर–मुल राष्ट्रीय महामार्ग (एनएच–९३०) हा विदर्भातील अत्यंत महत्त्वाचा राष्ट्रीय महामार्ग असून, या मार्गावरून दररोज हजारो मालवाहू ट्रक, बस, दुचाकी, चारचाकी वाहने तसेच शेतकरी, विद्यार्थी, कर्मचारी, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिक प्रवास करतात. याच मार्गावरून कृषी उत्पादनांची वाहतूक, औद्योगिक मलाची ने–आण तसेच पर्यटनालाही मोठी चालना मिळते. मात्र, सध्या या महामार्गाची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. विशेषतः पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. या खड्ड्यांमुळे अपघात घडले असून, अनेक निष्पाप नागरिकांना आपला जीव गमवावा लागला आहे. अनेक जण गंभीर जखमी झाले असून, रुग्णवाहिका नाही वेळेत पोहोचण्यात अडथळे निर्माण होत असल्याने आपत्कालीन रुग्णांच्या उपचारांवर ही परिणाम होत आहे. या गंभीर परिस्थितीची दखल घेत आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी यांना पाठविलेल्या पत्रात या महामार्गाचे तातडीने तांत्रिक निरीक्षण करून संपूर्ण मार्गाची दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे. तसेच भविष्यात वारंवार होणारे नुकसान टाळण्यासाठी या मार्गाचे टप्प्याटप्प्याने सिमेंट काँक्रीट (सीसी) रस्त्यात रूपांतर करण्यासाठी आवश्यक प्रशासकीय मंजुरी देण्याची विनंतीही त्यांनी केली आहे.

# जागतिक आदिवासी दिनानिमित्त शिरपूर येथे शांतता कमिटीची बैठक

**अक्षराज : नंदकुमार बोरसे**

**दि.०४, शिरपूर (धुळे) :** शिरपूर तालुक्यात जागतिक आदिवासी दिवस उत्साहात व शांतता पूर्ण वातावरणात साजरा व्हावा यासाठी शिरपूर पोलिसांच्या वतीने शांतता कमिटीची बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत आ. काशीराम पावरा हे अध्यक्ष होते. मंगळवार, दिनांक ०४ ऑगस्ट २०२६ रोजी संध्याकाळी झालेल्या शांतता कमिटीच्या बैठकीत समाज बांधव व उपस्थितांना आ.काशीराम पावरा यांनी मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी समाज बांधवांना आवाहन केले. जागतिक आदिवासी दिनानिमित्त सर्व समाजाने ठरविल्या नुसार तालुक्यातील सर्व आदिवासी बांधवांची एकच मिरवणूक काढण्यात येणार आहे. यात सदर मिरवणूक चोपडा जीन ते पित्रेश्वर कॉलनी इथपर्यंत सदर मिरवणूक काढण्यात येणार आहे.यात आपल्या परंपरेनुसार प्रत्येकाने पारंपारिक वाद्य घेऊन मिरवणुकीत सहभागी व्हावे. यात पदाधिकाऱ्यांनी समाजाची जबाबदारी नेमून दिलेली आहे. कायदा सुव्यवस्था राखून अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने आपला जागतिक आदिवासी दिवस साजरा करायचा आहे. या जागतिक आदिवासी दिनाच्या मिरवणुकीत आदिवासी संस्कृतीचे दर्शन घडेल असे विविध प्रकारच्या वेशभूषा परिधान करून समाज बांधवांनी सहभागी व्हायचे आहे. तालुक्यासह राज्यात एक आदर्श जागतिक आदिवासी दिवस साजरा होईल असे प्रयत्न सर्वांनी करावयाचे आहेत. असेही त्यांनी यावेळी सांगितले.

बैठकीत मार्गदर्शन करतांना पोलीस उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील यांनी यावेळी कायद्याचा भंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल. त्यामुळे शांततेत मिरवणुकीत सहभागी होण्याचे आवाहन केले. तसेच डीजे न वाजवता आपल्या संस्कृतीच्या असणाऱ्या पारंपरिक वाद्यांचा वापर करावा असे आवाहनही त्यांनी केले.

शांतता कमिटीच्या बैठकीत पोलीस निरीक्षक किशोरकुमार परदेशी यांनी प्रास्ताविकात आदिवासी बांधवांना आवाहन करतांना सांगितले मिरवणुकीत



सहभागी होणाऱ्या आदिवासी बांधवांनी प्रत्यक्ष हत्यारे आणू नयेत तर प्रतिकांचा वापर करावा. मद्य प्राशन करून सहभागी होऊ नये.तसेच सोशल मिडीयाचा वापर चुकीच्या गोष्टींसाठी करू नये.तसेच त्यात कोणत्याही समाजाचा किंवा धर्माचा अपमान होईल अशा पोस्ट करू नये. यासह काही सूचना केल्या. शांतता कमिटीच्या बैठकीत आ.काशीराम पावरा, उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर पाटील, पोलीस निरीक्षक किशोरकुमार परदेशी, तालुका पोलीस ठाण्याचे मिलीद पवार, आदिवासी समाजातील रमण पावरा, जयवंत पाडवी, मनोज पावरा,दारासिंह पावरा यांच्यासह विविध पदाधिकारी, पोलीस पाटील आदी उपस्थित होते.

# निसर्गाचा अद्भुत चमत्कार लाल मातीच्या माथेरानमध्ये कड्यावरून वाहते शुभ्र जलधारा; धबधब्यांच्या सौंदर्याने पर्यटक मंत्रमुग्ध

**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.०४, माथेरान :** पावसाळा सुरू होताच वाहन मुक्त, हिरवाईने नटलेल्या माथेरानचे रूप अधिकच खुलून येते. सर्वत्र लाल मातीची चादर पसरलेली असताना ही डोंगरकड्यांवरून कोसळणारे धबधबे मात्र दुधासारखे शुभ्र दिसतात. लाल मातीतून उगम पावणारे हे पाणी कड्यावरून वाहताना स्वच्छ, निर्मळ आणि पांढरेशुभ्र दिसणे हा निसर्गाचा एक अद्भुत चमत्कारच असल्याची भावना पर्यटक व्यक्त करत आहेत.



माथेरानमधील विविध पॉइंट्स, दऱ्या आणि कड्यांवरून खळखळत कोसळणाऱ्या जलधारा सध्या पर्यटकांसाठी मुख्य आकर्षण ठरत आहेत. धुक्याची दुलई, हिरवीगार वनराई, पावसाच्या सरी आणि शुभ्र धबधब्यांचा नयनरम्य संगम पाहण्यासाठी मुंबई, पुणे तसेच राज्याच्या विविध भागांतून पर्यटक मोठ्या संख्येने माथेरानमध्ये दाखल होत आहेत.

धबधब्यांच्या सान्निध्यात पावसात मनसोक्त भिजणे, थंडगार पाण्याचा आनंद घेणे, निसर्गरम्य छायाचित्रे आणि व्हिडिओ टिपणे याचा पर्यटक आणि स्थानिक नागरिक मनमुराद आनंद लुटत आहेत. डोंगरदऱ्यांतून वाहणाऱ्या या स्वच्छ शुभ्र जलधारा आणि सभोवतालची लाल माती यातील विलक्षण विरोधाभास प्रत्येकाचे लक्ष वेधून घेत आहे.

निसर्ग जणू स्वतः च आपली अद्भुत कलाकारी सादर करत आहे. लाल मातीतून प्रवास करूनही पाणी आपला निर्मळपणा कायम ठेवते आणि कड्यावरून दुधाळ धबधब्यांच्या रूपाने कोसळते. हीच माथेरानच्या पावसाळी पर्यटनाची खरी ओळख असून, पर्यटकांना पुन्हा पुन्हा येथे येण्याची मोहिनी घालणारे हे निसर्गाचे अनमोल वरदान आहे.

सध्या माथेरानमधील प्रत्येक पॉईंटवरून दिसणाऱ्या या शुभ्र जलधारा, धुक्यात हरवलेले डोंगर आणि हिरवाईने नटलेला परिसर पर्यटकांना अक्षरशः मंत्रमुग्ध करत असून पावसाळी पर्यटनासाठी माथेरान पुन्हा एकदा आकर्षणाचे केंद्र बनले आहे.

# नियुक्ती रद्द तरीही सेवानिवृत्त अधिकारी पालिकेत कार्यरत?; प्रहार संघटनेचा गंभीर आरोप

## सखोल चौकशी करा, दोषींवर कारवाई करा; अन्यथा आंदोलनाचा इशारा




**अक्षराज : अभिनव येलवे**

**दि.०४, पनवेल (नवी मुंबई) :** पनवेल महानगरपालिकेत नियुक्ती रद्द झाल्यानंतरही काही सेवानिवृत्त अधिकारी नियमबाह्य पद्धतीने कामकाज करत असल्याचा गंभीर आरोप प्रहार सामाजिक संघटनेने केला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर फौजदारी कारवाई करण्याची मागणी संघटनेने पालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्याकडे केली आहे. संघटनेचे रायगड जिल्हाध्यक्ष डॉ. सुनील शिरीषकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या आदेशानुसार विविध कामांसाठी नियुक्त करण्यात आलेल्या काही अधिकाऱ्यांचा कार्यकाळ संपुष्टात आला होता. त्यानंतर पालिका प्रशासनाने मार्च महिन्यात २८ सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची नियुक्ती रद्द करून त्यांची सेवा समाप्त केली होती. मात्र, यानंतरही काही अधिकारी कोणत्याही वैध नियुक्ती आदेशाशिवाय पालिकेच्या विविध विभागांमध्ये कार्यरत असल्याचे निदर्शनास आले आहे. विशेषतः मालमत्ता विभाग आणि आरोग्य विभागात काही सेवानिवृत्त अधिकारी नियमितपणे काम करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या अधिकाऱ्यांना कोणाचा पाठिंबा आहे, कोणाच्या आदेशावर ते काम करत आहेत आणि त्यांना कार्यालयात प्रवेश कसा दिला जात आहे, याबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. या संपूर्ण प्रकरणात आर्थिक गैरव्यवहाराची शक्यता नाकारता येत नसल्याने स्वतंत्र चौकशी समितीमार्फत तपास करून दोषी अधिकारी व संबंधित सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी प्रहार संघटनेने केली आहे. तसेच जबाबदार प्रशासनिक अधिकाऱ्यांचे तात्काळ निलंबन करून विभागीय चौकशी सुरू करण्याची ही मागणी करण्यात आली आहे.

**कारवाई न झाल्यास आंदोलन**

पालिका वर्तुळात काही सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना पुन्हा सेवेत सामावून घेण्याचे आश्वासन देण्यात आल्याची चर्चा असून, ही बाब अत्यंत गंभीर असल्याचे प्रहार संघटनेचे म्हणणे आहे. या प्रकरणात तातडीने निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही संघटनेने दिला आहे.

# शिरपूर तालुक्यात 'लेक लाडकी' योजना यशस्वी; १ हजार २६८ मुलींच्या खात्यावर थेट आर्थिक मदत जमा

**अक्षराज : नंदकुमार बोरसे**

**दि.०४, शिरपूर (धुळे) :** मुलींच्या जन्माकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन सकारात्मक बदलावा आणि त्यांच्या शिक्षणाला व सक्षमीकरणाला बळ मिळावे, या उद्देशाने राज्य शासनाने सुरू केलेली 'लेक लाडकी' योजना शिरपूर तालुक्यात प्रभावी ठरत आहे. एकात्मिक बालविकास सेवा प्रकल्पांतर्गत शिरपूर तालुक्यातील तब्बल १ हजार २६८ पात्र लाभार्थी मुलींच्या बँक खात्यावर थेट अनुदान जमा करण्यात आले आहे.

**योजनेचे स्वरूप आणि लाभ**

१ एप्रिल २०२३ नंतर जन्मलेल्या मुलींसाठी ही योजना लागू करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत मुलीच्या जन्मापासून तिच्या शिक्षणाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर टप्प्याटप्प्याने एकूण १ लाख ०१ हजार (एक लाख एक हजार रुपये) एवढी भरीव आर्थिक मदत दिली जाते.

अर्ज आणि मंजुरीची सद्यस्थिती

**प्रकल्पाधिकाऱ्यांची माहिती :**

तालुक्यातून प्राप्त झालेल्या अर्जांपैकी बहुतांश मुलींच्या खात्यावर अनुदान जमा झाले आहे. ज्या १२२ अर्जांमध्ये तांत्रिक त्रुटी आढळल्या आहेत, त्यांच्या त्रुटींची पूर्तता करून त्वरित प्रस्ताव मंजूर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. योजनेचा लाभ तळागाळातील प्रत्येक गरजू मुली पर्यंत पोहोचवण्यासाठी बालविकास प्रकल्प कार्यालय कटिबद्ध आहे.

**– वैशाली निकम (बालविकास प्रकल्प अधिकारी, शिरपूर जि.धुळे)**

**एकूण प्राप्त अर्ज :** १,६०४
अनुदान जमा झालेले पात्र अर्ज :- १,२६८
अंतिम टप्प्यात असलेली प्रक्रिया :- २१४ अर्ज
तांत्रिक त्रुटी असलेले अर्ज :- १२२ अर्ज

# एल-निनोच्या सावटानंतर पुराने शेतकरी घायाळ!

## शेतकऱ्यांवर ओढावले दुबार पेरणीचे संकट : बल्लारपूर तालुक्यात शेतकऱ्यांची दैनावस्था

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०४ विसापूर (चंद्रपूर) :** शेतकऱ्यांनी एल-निनोचे सावट असताना खरीप हंगामासाठी जीवतोड मशागत केली. निसर्गाची मदत होणार म्हणून शेतात पेरणी केली. मात्र जुलै महिन्याच्या उतरार्धात वर्धा व इरई नदीच्या पुराने सोयाबीन, कापूस, भात, तूर, मिरची व भाजीपाला पिकांची नासाडी झाली. याचा सर्वाधिक फटका नदी काठावरील शेतकऱ्यांना बसला. परिणामी शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढावले आहे. शेतकऱ्यांच्या दैनावस्थेची दखल शासनाने घ्यावी, अशी मागणी पिडीत शेतकऱ्यांची मागणी आहे.

बल्लारपूर तालुक्यात खरीप हंगामाचे कृषी क्षेत्र जवळपास एक हजार पाचशे हेक्टर कृषी क्षेत्र पुराने प्रभावित झाले आहे. याचा फटका विसापूर, नांदगाव ( पोडे ), हडस्ती, चारवट, बल्लारपूर, बामणी ( दुधोली), दहेली, लावारी, कळमना, आमडी, पळसगाव, कोठारी, किन्ही, काटवली ( बामणी) आदी भागातील शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात बसला आहे. येथील शेतकऱ्यांवर पुन्हा एकदा दुबार पेरणीचे संकट ओढावले आहे.

पूर ओसरल्यावर शेतात केवळ चिखल साचतो, असे भयान वास्तव शेतकऱ्यांचे आहे. दरवर्षी केवळ आशेवर मशागत करुन पेरणी करायची. कर्ज काढून बियाणे, खते, औषधे खरेदी खर्च करा. मात्र पुराने सर्वस्व हिरावल्याने शेतकऱ्यांची दैनावस्था झाली आहे. ही भीषणता बळीराजाला सोसावी लागत आहे. यावर पूर नियंत्रणासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची नितांत गरज आहे.



- बल्लारपूर तालुक्यातील वर्धा नदीकाठच्या शेतकऱ्यांचे पुराने नुकसान झाले आहे. पूरग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्याबाबत शासनस्तरावर कृषी सहाय्यक, तलाठी, ग्रामपंचायत अधिकारी, मंडळ अधिकारी यांना शेतकऱ्यांच्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्याचे निर्देश दिले आहे. पंचनामे पूर्ण करून अहवाल शासनाकडे तातडीने पाठवला जाणार आहे.

**– रेणुका कोकाटे, तहसीलदार, बल्लारपूर**

- आम्हाला दरवर्षी पुराचा मोठ फटका बसतो. शेतातील सोयाबीन, कापूस व भाजीपाला पिकांची पुराने नासाडी होते. आम्ही शेतीचे कर्ज कसे फेडावे. कुटुंबाचा उदरनिर्वाहाचा प्रश्न कसा सोडवावा, असा प्रश्न नेहमी उभा असतो.

**– मारोती वाढई, पिडीत शेतकरी हडस्ती, ता.बल्लारपूर**

- पुराने हातातोंडाशी आलेला घास हिरावला जाते. कर्जाची उचल करून शेती करावी लागते. आमच्या मेहनतीवर पुराने पाणी फिरते. नेहमीच येणाऱ्या पुराने आम्ही घायाळ झालो. मात्र उदरनिर्वाहाचे दुसरे साधन नसल्याने शेती व्यवसाय करत आहे. हा आमचा नाईलाज आहे.

**– विलास टोंगे, पिडीत शेतकरी, विसापूर**

# थोडक्यात बातम्या

## जिजाऊ संस्थेकडून अघई केंद्रातील १९ शाळांमध्ये विद्यार्थ्यांना ४ हजार ५०० मोफत वह्यांचे वितरण



**अक्षराज : सुनिल फर्डे**

**दि.०४, शहापूर (ठाणे) :** शिक्षण हा प्रत्येक विद्यार्थ्याचा मूलभूत हक्क असून आर्थिक परिस्थितीमुळे कोणताही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये, या सामाजिक भावनेतून जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्था, महाराष्ट्र संस्थापक अध्यक्ष निलेश सांबरे यांच्या संकल्पनेतून संपूर्ण कोकणात ३५ लाख मोफत वही वाटप अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत शहापूर तालुक्यातील अघई केंद्रातील १९ शाळांमध्ये मोफत वही वाटप कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.या उपक्रमामध्ये टहारपूर हायस्कूल, टहारपूर जिल्हा परिषद शाळा, वाघिवली, नेवरे, डिंभे, ठाकूरपाडा, मोहिली, चिंचपाडा, भावसे, खोस्ते, बीबीचापाडा, भुईशेत, गरेलपाडा, चक्कीचापाडा, पेंढरी, पारेला, चराचापाडा, बोराला आणि अघई येथील सुमारे १,४०० विद्यार्थ्यांना जवळपास ४,५०० मोफत वह्यांचे वितरण करण्यात आले. विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांनी या सामाजिक उपक्रमाचे मनापासून स्वागत करत जिजाऊ संस्थेप्रती कृतज्ञता व्यक्त केली.यावेळी जिजाऊ संघटनेचे कार्याध्यक्ष धीरज सांबरे, जिजाऊ संघटना शहापूर अध्यक्ष तथा रत्नागिरी संपर्क प्रमुख दिनेश निमसे, जिजाऊ संस्थेचे सुदर्शन पाटील, किशोर धसाडे, सुनील निपुर्त, जयवंत गोदडे, विनोद निमसे, यशवंत वाख, आशिष कटारे तसेच जिजाऊ संस्थेचे पदाधिकारी, कार्यकर्ते, शिक्षक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी बोलताना दिनेश निमसे म्हणाले, निलेश सांबरे यांच्या नेतृत्वाखाली जिजाऊ संस्था शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक क्षेत्रात सातत्याने लोकाभिमुख उपक्रम राबवत आहे. वही वाटप हा केवळ साहित्य वितरणाचा कार्यक्रम नसून विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्याचा पाया मजबूत करण्याचा संकल्प आहे. शहापूर तालुक्यातील एकही विद्यार्थी आर्थिक अडचणीमुळे शिक्षणापासून वंचित राहू नये, हा संस्थेचा निर्धार आहे. ज्या विद्यार्थ्यांनी अधिकारी बनण्याचे स्वप्न पाहिले आहे, त्यांच्या स्वप्नपूर्तीसाठी आवश्यक ते सर्व सहकार्य जिजाऊ संस्था करेल.विद्यार्थ्यांनी केवळ जिद्द, मेहनत आणि अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे.यावेळी सुदर्शन पाटील यांनी सांगितले की, शहापूर तालुक्यातील उर्वरित सर्व शाळांमध्येही पुढील काही दिवसांत मोफत वही वाटप अभियान पूर्ण करण्यात येणार असून हजारो विद्यार्थ्यांना या उपक्रमाचा लाभ मिळणार आहे. शिक्षणाला प्रोत्साहन देणाऱ्या या अभियानामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण होत असून जिजाऊ संस्थेचे हे कार्य समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

## चारठाण्यात जिओ नेटवर्क दिवसभर ठप्प; आठवडी बाजारात ऑनलाइन व्यवहारांवर परिणाम



**अक्षराज : अलीम शेख**

**दि.०४, चारठाणा (परभणी) :** चारठाणा येथील सोमवारी भरलेल्या आठवडी बाजाराच्या दिवशी जिओचे मोबाईल नेटवर्क दिवसभर ठप्प राहिल्याने व्यापारी, ग्राहक आणि विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. सकाळपासूनच जिओ नेटवर्कची रेंज गायब झाल्याने मोबाईल कॉल, इंटरनेट सेवा आणि णझखद्वारे होणारे ऑनलाइन व्यवहार पूर्णपणे विस्कळीत झाले. चारठाणा ही परिसरातील प्रमुख बाजारपेठ असून सोमवारी येथे मोठ्या प्रमाणावर आठवडी बाजार भरतो. आसपासच्या गावांतील नागरिक खरेदीसाठी येत असल्याने बहुतांश व्यवहार QR कोड, UPI आणि ऑनलाइन माध्यमातून होतात. मात्र दिवसभर नेटवर्क नसल्याने अनेक व्यापाऱ्यांचे व्यवहार रखडले, तर ग्राहकांना ही मनस्ताप सहन करावा लागला. स्थानिक नागरिकांनी सांगितले की, गेल्या काही दिवसांपासून जिओ नेटवर्कची समस्या सातत्याने जाणवत आहे. कॉल लागत नाहीत, लागले तरी आवाज स्पष्ट ऐकू येत नाही आणि मोबाईल इंटरनेटही वारंवार बंद पडत असल्याच्या तक्रारी आहेत.या वारंवार उद्भवणाऱ्या समस्येमुळे अनेक ग्राहक आता आपले जिओ सिम इतर सेवा प्रदात्यांकडे, विशेषतः एअरटेल आणि व्होडाफोन-आयडिया (तळ) मध्ये पोर्ट करण्याचा पर्याय स्वीकारत असल्याचेही समोर आले आहे.चारठाणा ही मोठी व्यापारी बाजारपेठ असल्याने दर्जेदार मोबाईल नेटवर्कची नितांत गरज आहे. त्यामुळे जिओ कंपनीने तातडीने तांत्रिक बिघाड दूर करून नेटवर्क सेवा सुरळीत करावी, तसेच टॉवरची क्षमता वाढवून ग्राहकांना अखंड सेवा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी नागरिक, व्यापारी व विद्यार्थ्यांकडून होत आहे.

## खापरखेडा येथे आचार्य बालकृष्ण यांच्या जयंतीनिमित्त 'जडीबुटी दिवस' साजरा



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०४, नागपूर :** पतंजली योग समिती खापरखेडातर्फे आचार्य बालकृष्ण महाराज यांच्या जन्मदिवसाचे औचित्य साधून 'जडीबुटी दिवस' उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी प्रकाश नगर कॉलनीतील आझाद चौकासमोर जडीबुटी गार्डनचे भव्य उद्घाटन पार पडले. कार्यक्रमाचे उद्घाटन खापरखेडा औष्णिक वीज केंद्राचे उपमुख्य अभियंता नितीन रोकडे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी उपमुख्य अभियंताद्वय सचिन देगवेकर, किशोर सूर्यवंशी तसेच अधीक्षक अभियंता प्रशांत साखरकर व कार्यकारी अभियंता विवेक पेटकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विविध औषधी वनस्पतींची लागवड करण्यात आली. आजच्या वातावरणात आयुर्वेदिक वनस्पतींची नितांत गरज असून पतंजली योग समितीने राबवलेला हा उपक्रम अत्यंत स्तुत्य व कौतुकास्पद आहे, असे विचार मान्यवरांनी यावेळी व्यक्त केले.

आयुर्वेदिक वनस्पती तज्ज्ञ नरेश तरारे यांच्या संकल्पनेतून या गार्डनमध्ये तब्बल १११ प्रकारच्या औषधी वनस्पतींची लागवड करण्यात आली आहे. विशेष म्हणजे प्रत्येक औषधी वनस्पतीचे महत्त्व, तिची ओळख ती कुठे आढळते आणि कोणत्या आजारावर उपयुक्त ठरते याची सविस्तर माहिती देणारा फलक प्रत्येक रोपाजवळ लावून उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले.या अभिनव संकल्पनेतून प्रेरणा घेऊन नागरिकांनी आपापल्या घरी आयुर्वेदिक वनस्पती लावण्याचा संकल्प केला. कार्यक्रमाचे संचालन नरेश तरारे यांनी केले तर आभार अमर जैन यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वंदना इंगळे, श्रीकांत नमलेवार, रूपाली राठोड, कल्याणी शेंडे, शुभांगी पोईनकर, वैशाली तरारे, कविता मुंडे, यामिनी कैलुके, वर्षा शेंडे, नीता राठोड, लता डोंगरे व उषा मोहड आदींनी परिश्रम घेतले.